अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
१६.०९.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २२८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## ४ हॉटेल्सवर एफडीएची कारवाई

### कॅफे मोंडेगर, महाराष्ट्र बिर्याणी सेंटरचे परवाने निलंबित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी महाराष्ट्राच्या अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मुंबईतील चार मोठ्या खाद्यप्रतिष्ठानांचे परवाने निलंबित केले आहेत. यामध्ये कुलाबा येथील प्रसिद्ध 'कॅफे मोंडेगर' आणि कांदिवली पूर्व येथील 'महाराष्ट्र बिर्याणी सेंटर'चा समावेश आहे. अन्न सुरक्षा नियमावलीच्या 'शेड्युल ४' मधील निकषांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे.

सण-उत्सवांच्या काळात विशेष मोहीम गणेशोत्सव व आगामी सणांच्या पार्श्वभूमीवर एफडीएने बृहन्मुंबई क्षेत्रात ३८ खाद्यप्रतिष्ठानांची तपासणी केली असून दूध, खवा, तूप आणि मिठाईचे ४७ नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहेत. या मोहिमेत २४८ किलो खाद्यपदार्थ (२२५ किलो खवा आणि २३ किलो बर्फी) जप्त करण्यात आले असून एका हॉटेलला २० हजारांचा दंड ठोठावण्यात आला आहे. इतर तीन आस्थापनांवरही कुऱ्हाड


११ सप्टेंबरला केलेल्या तपासणीत शेड्युल्ड ४ चे उल्लंघन आढळल्याने एफडीएने खालील तीन ठिकाणांचे परवाने निलंबित केले. यात महाराष्ट्र बिर्याणी सेंटर, त्रिभुवन डेअरी फार्म (दुकान क्र. १ आणि ४, व्हीनस रीजन्सी सोसायटी, नवरोजी लेन, घाटकोपर पश्चिम) आणि महावीर कॅश्यू अँड फूड्स प्रा.लि. (भानुशाली नगर, टिळक रोड, घाटकोपर पूर्व) यांचा समावेश आहे.

एफडीएने संबंधित आस्थापनांना त्रुटी दूर करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या असून, आवश्यक सुधारणा पूर्ण झाल्यानंतरच परवाना पुन्हा सुरू करण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. नागरिकांनी स्वच्छता व अन्नसुरक्षेचे निकष पाळणाऱ्या प्रतिष्ठानांमधूनच खाद्यपदार्थ खरेदी करावेत, तसेच संशयास्पद अन्नपदार्थांची तक्रार एफडीएकडे नोंदवावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## मनोज जरांगेंची १३वी मागणी पूर्ण करणे अशक्य

### मंत्री गिरीश महाजन : कायद्यात बसत नसलेल्या मागणीचा आग्रह धरू नये

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा मुंबईच्या दिशेने कूच केली असली तरी त्यांच्या १३ मागण्यांपैकी शेवटची मागणी पूर्ण करणे शक्य नसल्याची भूमिका मंत्री गिरीश महाजन यांनी बुधवारी स्पष्ट केली.

कास्ट व्हॅलिडिटी रद्द करण्याची मागणी कायद्यात बसत नसल्याने ती मान्य करता येणार नाही, असे सांगत जरांगे यांनी या मागणीचा आग्रह धरू नये, असे आवाहन महाजन यांनी केले. सरकारने जरांगे यांच्या १३ पैकी १२ मागण्या मान्य केल्याचेही त्यांनी सांगितले.

कास्ट व्हॅलिडिटी रद्द करून टाका, ही मागणी शक्य नाही. अशा काही मागण्या आहेत की, त्या कायद्यामध्ये कुठेही बसत नाहीत. त्या पूर्ण करता येणार नाहीत, असे महाजन यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

मराठा आरक्षणासाठी दीर्घकाळ काम करणाऱ्या समाजातील अनेक तज्ज्ञांनीही सरकारची भूमिका मान्य केली असल्याचे सांगत, सरकार सकारात्मक असताना जरांगे यांनी टोकाची भूमिका घेऊ नये, असेही त्यांनी म्हटले. जरांगे यांच्या आंदोलनाबाबत सरकारची भूमिका यापूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केली असल्याचे महाजन यांनी सांगितले. त्यांच्या जवळपास १३ मागण्या होत्या आणि त्यापैकी १२ मागण्या मान्य झाल्याचे महाजन यांनी नमूद केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनीही यापूर्वी १३ पैकी १२ मागण्या मान्य झाल्याचे सांगत, उर्वरित मागणी न्यायालयीन प्रक्रियेशी संबंधित असल्याचे स्पष्ट केले होते.

जशास तसे उत्तर देण्याचा सरकारचा प्रश्नच नसून हा विषय संपवायचा आहे, असे महाजन यांनी सांगितले. गेल्या काही वर्षांत मराठा समाजाला सरकारने न्याय देण्याचे काम केले असून, गरीब मराठा विद्यार्थ्यांसाठी विविध सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत, असा दावा त्यांनी केला. ओबीसी समाजाला मिळणाऱ्या काही सोयी-सवलतींच्या धर्तीवर मराठा समाजालाही सुविधा देण्यात आल्याचे सांगत हजारो विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच अनेकांना एसईबीसी आरक्षणाचा लाभ मिळाला असून नोकऱ्याही मिळाल्याचे ते म्हणाले.

### थोडक्यात

## १४ दुचाकी जळून खाक, एक महिला रुग्णालयात दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – बुधवारी पहाटे भिवंडीच्या खंडुपडा परिसरातील उमर अपार्टमेंटच्या तळघरातील पार्किंगमध्ये एका भीषण आगीची दुर्दैवी घटना घडली. या आगीत तब्बल १४ दुचाकी जळून खाक झाल्या असून, इमारतीमध्ये धूर पसरल्याने रहिवाशांमध्ये एकच तारांबळ उडाली आणि सुरक्षेसाठी त्यांना इमारतीच्या गच्चीवर धाव घ्यावी लागली. शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा संशय घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, ही आग पहाटे पावणेचार ते चारच्या दरम्यान लागली. आगीच्या तीव्र ज्वाळांनी संपूर्ण पार्किंग परिसर वेढला होता. आग नियंत्रणात आल्यानंतर पाहणी केली असता, १४ दुचाकी पूर्णपणे जळून खाक झाल्याचे निष्पन्न झाले.

## विवाहित प्रेयसीला निर्जनस्थळी नेलं अन पेट्रोल ओतून जिवंत जाळलं, धक्कादायक कारण समोर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**रायपूर** – छत्तीसगडच्या रायपूर जिल्ह्यातून माणुसकीला काळिमा फासणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. विवाहित प्रेयसीला आधी निर्जनस्थळी नेलं, गाडीच्या डिक्कीतून पेट्रोलची बाटली काढली आणि तिच्यावर पेट्रोल ओतून पेटवून दिलं. गंभीर भाजलेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणात पोलिसांनी तिच्या २६ वर्षीय प्रियकराला अटक केली असून, आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्याची माहिती आहे. वीरू धीवर असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव असून, मृत महिलेचं नाव राजकुमारी साहू आहे.

लग्नातील अडथळे आणि...प्राथमिक तपासानुसार, राजकुमारीचा इतर व्यक्तींशी असलेला संपर्क आणि दोघांच्या लग्नात निर्माण होणारे कथित अडथळे यामुळे वीरू संतापलेला होता. याच कारणातून त्याने हत्या केल्याचं प्राथमिक तपासात समोर आलं आहे. ही घटना रायपूर जिल्ह्यातील माना पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली.

## शालेय पोषण आहाराचा टेम्पो उलटल्याने अपघात, दोन हमालांचा जागीच मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**जळगाव** – जिल्ह्यातील जामनेर तालुक्यात भीषण अपघाताची घटना घडली आहे. जामनेर तालुक्यातील शेंदुर्णी ते पहूर मार्गावर शालेय पोषण आहाराची वाहतूक करणारा टेम्पो अचानक टायर फुटल्याने उलटल्याने दुर्दैवी अपघात घडला. या दुर्दैवी घटनेत टेम्पोमध्ये पोषण आहाराच्या गोण्यांवर बसलेले दोन हमाल वाहनाबाहेर फेकले गेल्याने दोघांचाही जागीच मृत्यू झाला. मंगळवारी दुपारी हा अपघात घडलाय. जगदीश लालचंद पाटील (रा.कृष्णापुरी, पाचोरा) आणि अर्जुन तुकाराम पाटील (रा.बहिरम नगर, पाचोरा) अशी मृत व्यक्तींची नावे आहेत. प्राथमिक माहितीनुसार, शेंदुर्णी ते पहूर रस्त्यावरुन धावणाऱ्या ४०७ टेम्पोमध्ये पाचोरा येथून शालेय पोषण आहाराच्या गोण्या भरण्यात आल्या होत्या. हा माल पुढील वितरणासाठी नेला जात होता. वाहतुकीदरम्यान दोन हमाल टेम्पोमधील पोषण आहाराच्या गोण्यांवर बसले होते. टेम्पो रस्त्याने धावत असताना अचानक टायर फुटला अनब त्यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि टेम्पो रस्त्यावर उलटला. या अपघाताची तीव्रता एवढी होती की, गोण्यांवर बसलेले दोन्ही हमाल थेट वाहनाबाहेर फेकले गेले. त्यांना गंभीर दुखापत झाली आणि घटनास्थळीच त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच पहूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून अपघाताची कारणे आणि परिस्थितीची माहिती घेण्यास सुरुवात केली आहे. अपघात केवळ टायर फुटल्यामुळे झाला, असे मानून प्रकरण संपवण्याऐवजी वाहतुकीतील सुरक्षेच्या सर्व बाबींची चौकशी करण्याची मागणी होत आहे. वाहनाची तांत्रिक स्थिती, टायरची अवस्था, चालकाचे नियंत्रण का सुटले, तसेच वाहनात कामगारांना कोणत्या परिस्थितीत बसवण्यात आले होते, यासह विविध बाबींचा तपास आता केला जात आहे.

## नांदेडमध्ये १२ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार : २८ वर्षीय तरुणाला अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नांदेड** – नांदेड जिल्ह्यात १२ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी २८ वर्षीय आदिनाथ जाधव याला अटक केली आहे. ही घटना १३ सप्टेंबर रोजी घडल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. मुलीच्या कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुलगी काही कामासाठी घराबाहेर पडली होती. ती किराणा सामान घेण्यासाठी जात असताना आरोपीने तिला जबरदस्तीने थांबवून एका निर्जन ठिकाणी नेल्याचा आरोप आहे. घटनेनंतर मुलगी घरी पोहोचली आणि तिने आईला संपूर्ण प्रकार सांगितला. त्यानंतर आईने मुलीला तातडीने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात नेले. कुटुंबीयांच्या तक्रारीवरून पोलिसांनी संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करत आरोपीला अटक केली.

## भारत आणि पाकिस्तानच्या अरबी समुद्रात चक्क युद्धनौका धडकल्या, दिल्लीत तातडीने मोठ्या हालचाली

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**नवी दिल्ली** – अरबी समुद्रात भारतीय आणि पाकिस्तानी नौदलाच्या जहाजांची टक्कर झाली. ही घटना उत्तर अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीत घडली. भारताच्या म्हणण्यानुसार, नियमित देखरेख मोहिमेवर असलेले पाकिस्तानी जहाज अति वेगाने भारतीय युद्धनौकेच्या जवळ आले आणि त्याने धोकादायक पद्धतीने आपला मार्ग बदलला. या घटनेदरम्यान दोन्ही जहाजांची टक्कर झाली. या घटनेत कोणतेही मोठे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. सूत्रांनुसार, टक्कर झालेले पाकिस्तानी जहाज पीएनएस हुनैन आहे. हे पाकिस्तान नौदलाचे यारमौक-श्रेणीतील सागरी गस्ती जहाज असून, त्याचा वापर सागरी देखरेख आणि गस्तीसाठी केला जातो. टक्कर झालेल्या भारतीय नौदलाच्या जहाजाची ओळख अद्याप पटलेली नाही. जहाज आपला मार्ग बदलत असताना टक्कर यानंतर, भारताने नवी दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयाच्या प्रभारी दूतांना बोलावून तीव्र निषेध नोंदवला.





**वरुड :** कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे संचालक तथा उद्योजक राजेश गांधी यांना वाढदिवसानिमित्ताने पुष्पगुच्छ देतांना बाजार समिती सभापती नरेंद्र पावडे, संचालक प्रमोद पाटील कोहळे, सचिव नंदकिशोर बोडखे, माजी नगरसेवक मो.अश्पाक, दिलीप धर्मे व इतर.

# मनोज जरांगे मुंबईकडे रवाना

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*छत्रपती संभाजीनगर* – मुंबईत आंदोलनासाठी पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतरही, मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे– पाटील मंगळवारी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. गावोगावी नागरिकांकडून त्यांच्या ताफ्याचे जोरदार स्वागत




केले जात आहे. कुणबी नोंदी असलेल्या मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या मागणीसाठी जरांगे गेल्या १७ दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. गणेशोत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून मुंबई पोलिसांनी त्यांना आझाद मैदानावर आंदोलन करण्याची परवानगी नाकारली होती.

गाडीत पुढच्या सीटवर बसलेल्या जरांगे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा हवाला देत म्हटले, माझ्या समाजापेक्षा माझ्यासाठी काहीही महत्त्वाचे नाही. मी समाजासाठी जीव देईन किंवा आरक्षण मिळवेन. लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्याला रोखता येत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायव्यवस्था आमच्यासोबत आहे. आपल्याला मारण्याचा कट रचला जात असल्याचा पुनरुच्चार करताना जरांगे म्हणाले, देवेंद्र फडणवीस मला गोळ्या घालून मारू इच्छितात का, मी एकटा येत आहे.

मला मारण्याचा प्लॅन त्यांनी आखला आहे, तरीही मी मराठा समाजाचा विश्वासघात होऊ देणार नाही.

## तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |
| नाशिक | २६ | २२ |
| पुणे | ३० | २१ |

# वाठोड्यात तान्हा पोळा मोठ्या उत्साहात

### ३०० बालगोपालांचा समावेश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

*चांदस वाठोडा* – स्थानिक आर जी देंशमुख बुनियादी बाल विद्यामंदिराच्या प्रांगणात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तान्हा पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



बाल गोपालांनी आपले नंदीबैल सजून आणले होते. विविध वेशभूषा परिधान करुन बालगोपालांमध्ये उत्साह संचारला होता. गावातील नागरिकांनी देणगी स्वरुपात बक्षीस म्हणुन पैसे सुद्धा गोळा करण्यात आले. यामध्ये ३०० पेक्षा अधिक नंदीबैलासह बालगोपालांनी हजेरी लावली होती. नागरिकांमधुन देणगी स्वरुपात झालेली रक्कम जवळपास १ हजार ५०० रुपये जमा झाली होती त्यापैकी पोळी म्हणुन पन्नास रुपये प्रति नंदीबैल प्रमाणे देण्यात आली व पोळ्यानिमित्य सगळ्या बालगोपालांना प्रत्येक सहभागी बालकांना पेन्सिल पेन वाटप करण्यात आली. ग्रामवासीयांमधून पंच कमिटीची निवड करण्यात येते, हे विशेष. यावेळी दरवर्षीप्रमाणे गुढी घेऊन येणारे ह.भ.प.रामचंद्र महाराज देशमुख यांनी विशेष वेशभूषेमध्ये खंड बोलुन उपस्थिती ग्रामवासियांची मन जिंकले. मशाल घेऊन येणारे प्रशांत दळवेकर उपस्थित होते तसेच यावेळी ग्रामपंचायत कमिटी, कर्मचारी व सदस्य महिला पुरुष, युवा वर्ग, बालगोपालांसह ग्रामवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शंकर देवस्थानच्या प्रांगणात तान्हा पोळा : १५० पेक्षा अधिक चिमुकल्यांचा सहभाग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

*चांदस वाठोडा* – दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा शंकर देवस्थानच्या भव्य अशा प्रांगणात बालगोपालांचा तान्हा पोळा मोठया उत्सवात साजरा करण्यात आला. यामध्ये जवळपास १५० च्या वर चिमुकल्यांनी सहभाग घेतला होता.



स्व.माणिकराव सेवलकर व रमेशराव खंडेतोड यांच्या संकल्पनेतून हा तान्हा पोळा सुरू झाला असून दरवर्षी हा उत्सवात साजरा करण्यात येतो. यामध्ये सहभागी होणाऱ्या बालगोपालांना सोबत नंदी पूजन करुन व विनायक महल्ले हे विशेष वेशभूषेत येऊन बालगोपालांचे स्वागत करतात. गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते विशेष भेट वस्तू देऊन त्यांचा उत्साह वाढवण्यात येते. दरवर्षी तान्हा पोळाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये मोठ्या संख्येने सहभाग बालगोपालांचा होता. बालगोपालांनी आनंद व्यक्त केला आणि त्यांच्या चेहऱ्यावर हास्य दिसत होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी चांदसच्या सरपंचा कमला युवनाते, उपसरपंच नितीन पानसे, पोलीस पाटील रिसिप देशमुख, दिपक देशमुख, शंकरराव चोबीतकर, रामभाऊ देशमुख, प्रमोद कापसे, किसना बोबडे, दिलीप सुरजुसे, श्रीकांत खंडेतोड, राजू तिवसकर, दिपक पानसे, विकास कुबडे, पियुष चोबितकर, पिंटू घाटोळे, प्रमोद देशमुख, विजय बोबडे, दिवाकर तायवाडे, शेखर कनाटे, प्रज्वल देशमुख, आशिष देशमुख, मनीष देशमुख, अमोल देशमुख, लुकेश उपासे, शुभम उपासे, चेतन सुरजुसे, चेतन कुबडे, राहुल कनाटे, मंगेश खंडेतोड, भूषण महल्ले, अविनाश पानसे, अंकुश झोड, वैभव कुबडे, अमोल सेवलकर, स्वराज देशमुख, अंकुश बोबडे, निखिल कनाटे, संजय महल्ले, प्रतीक खंडेतोड, प्रशांत कनाटे, आदर्श बोबडे, मयूर देशमुख, सचिन देशमुख, मारोतराव कुबडे, विष्णू चोबितकर, सतिश शेळके, मुकेश बारस्कर, नितीन शेळके, प्रकाश कुबडे, दिनेश खातदेव, सचिन तायवाडे व जनाई दुर्गा मंडळ सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले. चांदस या गावातील कार्यक्रमात महिला व पुरुष, युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित ग्रामवासीयांनी बालगोपालांचे कौतुक केले.

# दिघीमध्ये जहाजबांधणी : भारतातील सर्वात मोठा प्रकल्प

## रायगडमध्ये, माझगाव डॉकची २७ हजार कोटींची गुंतवणूक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – रायगड जिल्ह्यात भारतातील सर्वात मोठा जहाजबांधणी प्रकल्प उभारला जाणार आहे. दिघी बंदरात नवीन ग्रीनफील्ड जहाजबांधणी क्लस्टर उभारण्यासाठी सुमारे २७,००० कोटींची गुंतवणूक माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेडतर्फे केली जाणार आहे. या निर्णयामुळे ९० हजार



रोजगार निर्माण होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्र सरकारने मंगळवारी दिलेल्या माहितीनुसार, संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रम असलेल्या माझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड (एमडीएल) आणि नॅशनल शिपबिल्डिंग अँड हेवी इंडस्ट्रीज पार्क महाराष्ट्र लिमिटेडसोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित होते. या प्रकल्पामुळे दिघी येथे दरवर्षी किमान २० लाख ग्रॉस टन क्षमतेचे जहाजबांधणीचे उद्दिष्ट ठेवले आहे. २७ हजार कोटी कोटींच्या प्रस्तावित गुंतवणुकीसह हा प्रकल्प मोठ्या व्यावसायिक जहाजांच्या बांधणीस सक्षम करेल आणि देशाच्या सागरी औद्योगिक क्षमतेला बळ मिळणार आहे.

### जागृत इंग्लिश प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेचे

# अरसलान खान व रुद्र शेटे यांची वुशु खेळात निवड

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जागृत इंग्लिश प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेचे असल लहान खान व रुद्र शेटे उशू खेड प्रकारात विभागीय स्पर्धेकरिता निवड स्थानिक जागृत इंग्लिश प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळा येथील अरसलान खान व रुद्र शेटे या विद्यार्थ्यांची वुशु या खेळ प्रकारात विभागीय स्पर्धेकरीता निवड झाली आहे.




क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरावर आयोजित वुशु खेळामध्ये विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गिरीश गांधी, उपाध्यक्ष डॉ.मनोहर आंडे, सचिव संतोष क्षिरसागर, मुख्याध्यापिका पूजा मांडवगडे, पर्यवेक्षिका धनश्री लाडोळे, प्रशिक्षक कृष्णा मिश्रा, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अरसलान खान, रुद्र शेटे यांचे अभिनंदन केले असून त्यांना पुढील वाटचाली करीता शुभेच्छा दिल्या आहे.

# स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथे विद्यार्थी परिचय नाविण्यपुर्ण कार्यक्रमाला सुरुवात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स, येथील बीसीए विभागाच्या वतीने विद्यार्थी परिचय कार्यक्रमाला सुरुवात झाली. ७ दिवस चाललेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विविध शैक्षणिक, मार्गदर्शनपर, व्यक्तिमत्त्व विकास, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या प्रारंभी बीसीए विभागातील सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना विभागाची ओळख करून दिली. बीसीए अभ्यासक्रमाची रचना, विविध विषय, शैक्षणिक उपक्रम, विभागाची कार्यपद्धती तसेच विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या विविध संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. नव्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वातावरणाशी परिचित करून देण्याबरोबरच त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

विद्यार्थ्यांसाठी आयोजित तज्ज्ञ मार्गदर्शन सत्रात नरसम्मा महाविद्यालय अमरावती येथील डॉ.दिनेशकुमार सातंगे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व, बदलते तंत्रज्ञान, करिअरच्या विविध संधी तसेच भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी आवश्यक कौशल्ये विकसित करण्याबाबत मार्गदर्शन केले.

कॉलेजच्या प्राचार्य डॉ.प्राची ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना मानवी मूल्यांचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबतच शिस्त, प्रामाणिकपणा, सहकार्याची भावना, सामाजिक बांधिलकी आणि जबाबदारीची जाणीव जोपासावी असे त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याला चालना देण्यासाठी प्रिती महात्मे यांच्या मार्गदर्शनाखाली योगा व झुंबा सत्राचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या सत्रात उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी ड्रॉइंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचा आणि सर्जनशीलतेचा उपयोग करून विविध चित्रे साकारली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे तांत्रिक ज्ञान आणि सामान्य बौद्धिक क्षमता तपासण्यासाठी टेक्निकल क्विझ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध क्रीडा उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले.

या ७ दिवसीय कार्यक्रमात विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध विभागांचीही माहिती देण्यात आली. ग्रंथालय विभागाची माहिती प्रा.माधवी घोरमाडे, विद्यार्थी विकास विभाग क्रीडा व क्रीडा विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती बीएजेएमसी विभागप्रमुख प्रा.राहुल शिवारे तर एन.एस.एस.बद्दल माहिती प्रा.राजकुमार वानखडे यांनी विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांनी या विभागांच्या माध्यमातून मिळणाऱ्या विविध संधींचा लाभ घ्यावा आणि महाविद्यालयीन उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बीसीए विभागप्रमुख प्रा.अनुप बेले, प्रा.चेतन ढोले, प्रा.आलिया खान, प्रा.साक्षी राठी, प्रा.संजीवनी बारस्कर व इतर प्राध्यापक वर्गांनी मोलाची भूमिका बजावली. बीसीए नवप्रवेशित विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन जीवनाची आणि उपलब्ध विविध संधींची सविस्तर ओळख झाली. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग आणि उत्साहात हा कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

# संपादकीय

**सत्यासाठी काही सोडून द्यावं, पण कोणासाठीही सत्य सोडू नये.**

## वाणीची ताकद आणि संस्कृतचा पुनर्जन्म

पुण्यातील विद्यानंद बापट यांच्या तोंडून 'घटं भिन्द्यातब पटं छिन्द्यातब कुर्यादब गर्दभरोहणम्' हे संस्कृत सुभाषित अस्खलितपणे बाहेर पडले आणि काही क्षणांतच समाजमाध्यमांवर त्याची जोरदार चर्चा सुरू झाली. एका वाक्याने एवढी चर्चा का घडावी, हा प्रश्न अनेकांना पडू शकतो. परंतु ही घटना केवळ एका संस्कृत वाक्याच्या उच्चारापुरती मर्यादित नाही; ती आपल्या भाषिक संस्कृतीची, परंपरेची, शिक्षणपद्धतीची आणि सामाजिक मानसिकतेचीही परीक्षा घेणारी घटना आहे. समाजमाध्यमांच्या वेगवान युगात एका संस्कृत वाक्याने लाखो लोकांचे लक्ष वेधून घेतले, हीच गोष्ट संस्कृत भाषेचे आजही असलेले आकर्षण आणि तिची सांस्कृतिक ताकद अधोरेखित करते.

संस्कृत ही केवळ प्राचीन भाषा नाही; ती भारतीय ज्ञानपरंपरेचा मेरुदंड मानली जाते. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवद्गीता, आयुर्वेद, योग, नाट्यशास्त्र, व्याकरण, गणित, खगोलशास्त्र आणि तत्त्वज्ञान अशा असंख्य ज्ञानशाखांचा मूलस्त्रोत संस्कृत आहे. जगातील अनेक भाषांच्या अभ्यासकांनी संस्कृतच्या व्याकरणशास्त्राचे कौतुक केले आहे. पाणिनींच्या अष्टाध्यायीसारख्या व्याकरणग्रंथाने भाषाविज्ञानाला दिशा दिली. अशा भाषेचा एखादा सुंदर उच्चार आजही लोकांना आकर्षित करतो, यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही.

'घटं भिन्द्यातब पटं छिन्द्यातब कुर्यादब गर्दभरोहणम्' या सुभाषिताची चर्चा होताना अनेकांनी त्याचा अर्थ शोधण्याचा प्रयत्न केला. संस्कृत सुभाषितांची वैशिष्ट्ये अशीच असतात. काही शब्दांत ते गहन अर्थ व्यक्त करतात. 'सुभाषित' म्हणजे सुयोग्य, हितकारक आणि अर्थपूर्ण वचन. आपल्या पूर्वजांनी जीवनातील अनुभव, नैतिक मूल्ये आणि व्यवहारज्ञान यांना अशा सुभाषितांच्या माध्यमातून जतन केले. त्यामुळे अशा वाक्यांबद्दल उत्सुकता निर्माण होणे स्वाभाविक आहे.

आजच्या शिक्षणव्यवस्थेत संस्कृतचा परिचय अनेक विद्यार्थ्यांना केवळ गुण मिळिवण्यापुरता मर्यादित राहतो. पाठांतर होते; पण भाषेचा आत्मा समजून घेण्याचा प्रयत्न कमी दिसतो. परिणामी, एखादा व्यक्ती सहजतेने संस्कृत बोलताना किंवा सुभाषित म्हणताना दिसला, की ते अनेकांना विलक्षण वाटते. प्रत्यक्षात ही भाषा आपल्या दैनंदिन जीवनापासून इतकी दूर जाऊ नये, हीच खरी गरज आहे. कारण संस्कृत शिकणे म्हणजे केवळ धार्मिक ग्रंथ वाचणे नव्हे; तर भाषेची रचना, विचार करण्याची पद्धत आणि भारतीय ज्ञानपरंपरेची ओळख करून घेणे होय.

समाजमाध्यमांच्या युगात प्रत्येक घटना क्षणार्धात व्हायरल होते. मात्र प्रत्येक व्हायरल गोष्टीतून सकारात्मक चर्चा घडतेच असे नाही. विद्यानंद बापट यांच्या संस्कृत उच्चाराच्या निमित्ताने अनेकांनी संस्कृत सुभाषिते शोधली, त्यांचे अर्थ जाणून घेतले आणि भाषेविषयी नव्याने कुतूहल निर्माण झाले, हा या घटनेचा सकारात्मक पैलू म्हणावा लागेल. जर अशा घटनांमुळे तरुण पिढीला भाषेविषयी आवड निर्माण झाली, तर ते समाजासाठीही लाभदायक ठरेल.

संस्कृतचा प्रश्न हा कोणत्याही एका विचारसरणीशी जोडून पाहण्याची गरज नाही. भाषा ही संस्कृतीची वाहक असते. जशी मराठी, हिंदी, तमिळ, कन्नड किंवा बंगाली या आपल्या मातृभाषा महत्त्वाच्या आहेत, तशीच संस्कृतही भारतीय सांस्कृतिक वारशाचा महत्त्वाचा भाग आहे. अनेक भारतीय भाषांतील शब्दसंपत्तीवर संस्कृतचा प्रभाव आहे. मराठीतील असंख्य शब्द, म्हणी आणि वाक्प्रचार संस्कृतमधून आले आहेत. त्यामुळे संस्कृत समजली, तर मराठीचीही समृद्धी अधिक स्पष्टपणे जाणवते.

जगभरातही संस्कृतविषयी संशोधन सुरू आहे. अनेक परदेशी विद्यापीठांमध्ये संस्कृतचा अभ्यास केला जातो. संगणकीय भाषाविज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि भाषिक संरचनेच्या अभ्यासातही संस्कृतच्या व्याकरणाची चर्चा होत असते. यामुळे ही भाषा केवळ इतिहासात अडकलेली नसून आधुनिक संशोधनालाही प्रेरणा देणारी आहे, हे लक्षात येते.

विद्यानंद बापट यांच्या एका सहज उच्चाराने निर्माण झालेली चर्चा आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते. आपल्या सांस्कृतिक वारशाकडे पाहण्याची दृष्टी केवळ औपचारिक नसावी; तर जिज्ञासूपूर्ण असावी. भाषा जिवंत राहते ती तिच्या वापरामुळे. शाळांमध्ये सुभाषितांचे अर्थ समजावून सांगणे, संस्कृत संभाषण शिबिरे आयोजित करणे, मराठीसोबत संस्कृत शब्दसंपत्तीची ओळख करून देणे आणि डिजिटल माध्यमांवर भाषिक सामग्री उपलब्ध करणे, या माध्यमातून संस्कृत अधिक लोकाभिमुख होऊ शकते. या घटनेने हेही दाखवून दिले की, समाजाला दर्जेदार भाषिक अभिव्यक्ती अजूनही भावते.

# ब्रिक्स २०२६ : चीनच्या शेजारी मोदींचा 'क्रिटिकल मिनरल्स' संदेश आणि जागतिक सहकार्यास नवी दिशा

महत्त्वाच्या खनिजांचे शस्त्रीकरण टाळण्यापासून ते संसर्गजन्य आजारांसाठी एकत्रित इशारा प्रणालीपर्यंत इठखउडची व्यापक भूमिका

ब्राझीलमध्ये पार पडलेल्या ब्रिक्स शिखर परिषद २०२६ मध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक अर्थव्यवस्था, पुरवठा साखळी, आरोग्य सुरक्षा आणि तंत्रज्ञान सहकार्य या विषयांवर महत्त्वपूर्ण भूमिका मांडली. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या उपस्थितीत मोदींनी 'क्रिटिकल मिनरल्सचे शस्त्रीकरण होऊ नये' असा स्पष्ट संदेश दिला. त्याचबरोबर संसर्गजन्य रोगांचा मुकाबला करण्यासाठी BRICS Integrated Early Warning System या सामूहिक यंत्रणेवर सदस्य देशांमध्ये सहमती झाल्याची माहितीही त्यांनी दिली.

या दोन मुद्द्यांमुळे परिषदेतील भारताची भूमिका केवळ आर्थिक हितसंबंधांपुरती मर्यादित न राहता जागतिक सहकार्याच्या व्यापक चौकटीत महत्त्वाची ठरली.




### क्रिटिकल मिनरल्स म्हणजे नेमके काय?

क्रिटिकल मिनरल्स म्हणजे आधुनिक उद्योग, ऊर्जा संक्रमण आणि संरक्षण क्षेत्रासाठी अत्यावश्यक असलेली खनिजे. लिथियम, कोबाल्ट, निकेल, ग्रेफाइट, दुमिळ पृथ्वीतील घटक यांचा त्यात समावेश होतो. इलेक्ट्रिक वाहने, मोबाईल फोन, संगणक, सौरऊर्जा प्रकल्प, पवनऊर्जा, बॅटरी तंत्रज्ञान आणि आधुनिक संरक्षण उपकरणे या सर्वांसाठी ही खनिजे अपरिहार्य आहेत.

आज जगभरात हरित ऊर्जेकडे झुकाव वाढत असताना या खनिजांचे महत्त्व अभूतपूर्व वाढले आहे. त्यामुळे त्यांचा पुरवठा काही मोजक्या देशांवर अवलंबून राहिल्यास जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा धोका निर्माण होऊ शकतो.

### 'शस्त्रीकरण' म्हणजे काय?

पंतप्रधान मोदींनी वापरलेला "Wea{onisation of Critical Minerals" हा शब्द विशेष लक्षवेधी ठरला. त्याचा अर्थ असा की, कोणताही देश महत्त्वाच्या खनिजांचा पुरवठा राजकीय दबाव, व्यापार निर्बंध किंवा सामरिक फायद्यासाठी वापरू नये.

अलिकडच्या काळात जगाने सेमीकंडक्टर, ऊर्जा आणि पुरवठा साखळीतील अडचणींचा अनुभव घेतला आहे. अशा परिस्थितीत महत्त्वाच्या खनिजांचा पुरवठा खंडित झाल्यास उद्योग, उत्पादन आणि तंत्रज्ञान क्षेत्रावर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे खुली, विश्वासार्ह आणि विविध स्रोतांवर आधारित पुरवठा व्यवस्था उभी करण्याची गरज भारताने अधोरेखित केली.

### भारताची रणनीती

भारताकडे काही महत्त्वाच्या खनिजांचे साठे असले तरी अनेक खनिजांसाठी आयातीवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे भारताने देशांतर्गत शोधमोहीम वाढवणे, परदेशातील खाण प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करणे, पुनर्वापर तंत्रज्ञान विकसित करणे आणि आंतरराष्ट्रीय भागीदारी मजबूत करणे यावर भर दिला आहे.

ब्रिक्ससारख्या मंचावर हा मुद्दा मांडून भारताने विकसनशील देशांच्या सामूहिक हिताचे प्रतिनिधित्व करण्याचा प्रयत्न केला.

### संसर्गजन्य रोगांविरुद्ध BRICSची नवी यंत्रणा

या परिषदेतील आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे BRICS Integrated Early Warning System वर झालेली सहमती. कोविड-१९ महामारीने जगाला आरोग्य क्षेत्रातील समन्वयाचे महत्त्व शिकवले. अनेक देशांना वेळे-वर माहिती न मिळाल्याने मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले.

नव्या यंत्रणेच्या माध्यमातून सदस्य देशांमध्ये रोगांच्या उद्रेकाबाबत माहितीची देवाणघेवाण, लवकर इशारा, वैज्ञानिक सहकार्य आणि तातडीचा प्रतिसाद अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

यामुळे भविष्यातील महामारींचा मुकाबला करण्यासाठी BRICS देश अधिक सज्ज राहतील.

### BRICSची वाढती भूमिका

ब्रिक्समध्ये भारत, ब्राझील, रशिया, चीन आणि दक्षिण आफ्रिका या मूळ सदस्यांसह आता नव्या सदस्य देशांचाही समावेश झाला आहे. त्यामुळे हा समूह जागतिक लोकसंख्या, अर्थव्यवस्था आणि संसाधनांच्या दृष्टीने अधिक प्रभावी बनत आहे.

जागतिक आर्थिक व्यवस्थेत विकसनशील देशांचा आवाज अधिक ठळकपणे मांडण्यासाठी BRICS महत्त्वाचे व्यासपीठ ठरत आहे. व्यापार, गुंतवणूक, डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामान बदल आणि आरोग्य सुरक्षा अशा विविध विषयांवर सदस्य देश सहकार्य वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत.

### भारताची संतुलित भूमिका

भारताची परराष्ट्रनीती बहुपक्षीय सहकार्यावर आधारित असल्याचे या परिषदेत पुन्हा दिसून आले. एका बाजूला चीनसोबत BRICS मंचावर सहकार्य, तर दुसऱ्या बाजूला राष्ट्रीय हितांशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर स्पष्ट भूमिका हा भारताचा संतुलित दृष्टिकोन आहे.

क्रिटिकल मिनरल्सच्या संदर्भात भारताने कोणत्याही एका देशाचे नाव न घेता जागतिक स्तरावर मुक्त, विश्वासार्ह आणि नियमाधारित पुरवठा व्यवस्थेचा पुरस्कार केला. त्यामुळे हा संदेश व्यापक आर्थिक स्थैर्याशी जोडलेला ठरतो.

### आरोग्य, अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञान यांचा संगम

२०२६ च्या BRICS परिषदेत चर्चिलेले दोन्ही मुद्दे महत्त्वाच्या खनिजांचा सुरक्षित पुरवठा आणि संसर्गजन्य रोगांसाठी एकत्रित इशारा प्रणाली हे भविष्यातील जागतिक आव्हानांचे प्रतिनिधित्व करतात.

ऊर्जा संक्रमणासाठी आवश्यक खनिजे उपलब्ध राहणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच आरोग्य क्षेत्रातील वेगवान समन्वयही आवश्यक आहे. त्यामुळे आर्थिक विकास आणि सार्वजनिक आरोग्य यांना एकत्र जोडणारा दृष्टिकोन या परिषदेत पुढे आला.

निष्कर्ष ब्रिक्स २०२६ परिषद भारतासाठी केवळ राजनैतिक उपस्थितीची घटना नव्हती, तर भविष्यातील जागतिक व्यवस्थेबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे व्यासपीठ ठरली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महत्त्वाच्या खनिजांच्या शस्त्रीकरणाविरोधात मांडलेली भूमिका जागतिक पुरवठा साखळीतील स्थैर्याची गरज अधोरेखित करते, तर BRICS Integrated Early Warning System वरील सहमती आरोग्य सुरक्षेसाठी सामूहिक कृतीचे महत्त्व दर्शवते.

बदलत्या जागतिक परिस्थितीत संसाधनांचे जबाबदार व्यवस्थापन, विज्ञानाधारित सहकार्य आणि बहुपक्षीय संवाद या तिन्ही गोष्टी भविष्यातील स्थैर्यासाठी निर्णायक ठरणार आहेत. BRICS २०२६ ने या दिशेने नवा संवाद सुरू केल्याचे या परिषदेतून स्पष्टपणे दिसून आले.

# चवीच्या मोहात आरोग्याचा विसर

जिभेचे क्षणिक समाधान की शरीराची दीर्घकालीन हानी? आजच्या धावपळीच्या जीवनात माणसाला सर्व काही झटपट हवे आहे. अन्नही त्याला अपवाद राहिलेले नाही. रस्त्यावरील चटकदार पदार्थ, फास्ट फूड, तेलकट स्नॅक्स, गोड मिठाई, थंड पेये आणि प्रक्रिया केलेले खाद्यपदार्थ यांचे आकर्षण इतके वाढले आहे की, अनेकांनी घरगुती पौष्टिक आहारापासून नकळत पाठ फिरवली आहे. चवीच्या मोहात आपण आरोग्याचा विसर तर पडत नाही ना, हा प्रश्न आज प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

अलीकडेच मुंबईत अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी काही प्रसिद्ध खाद्यप्रतिष्ठानांवर कारवाई करण्यात आली. गणेशोत्सवासारख्या सणांच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने मोठ्या प्रमाणात तपासण्या करून दूषित खवा, मिठाई आणि इतर खाद्यपदार्थ जप्त केले. ही घटना केवळ नियमभंगाची बाब नाही; तर ग्राहक म्हणून आपण अन्नाच्या गुणवत्तेबाबत किती जागरूक आहोत, याचाही आरसा आहे.



### चटकदार चव, वाढते आजार

आजच्या आहारात मीठ, साखर आणि तेल यांचे प्रमाण धोकादायकरीत्या वाढले आहे. पिझ्झा, बर्गर, फ्रेंच फ्राईज, चायनीज पदार्थ, पॅकेज्ड चिप्स आणि सॉफ्ट ड्रिंक्स यांचे नियमित सेवन आता अनेकांच्या जीवनशैलीचा भाग बनले आहे. या सवयीमुळे लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, यकृताचे विकार आणि पचनसंस्थेचे अनेक आजार झपाट्याने वाढताना दिसत आहेत.

विशेष चिंतेची बाब म्हणजे ही समस्या आता केवळ प्रौढांपुरती मर्यादित राहिलेली नाही. लहान मुलांमध्येही लठ्ठपणा, दातांचे विकार आणि अपौष्टिकतेची समस्या वाढत आहे. चवीच्या नावाखाली त्यांना दिले जाणारे जंक फूड त्यांच्या भविष्यातील आरोग्यावर परिणाम करू शकते.

### सणांमध्येही संयमाची गरज

भारतीय सणांची ओळख म्हणजे गोडधोड आणि पारंपरिक पदार्थ. मोदक, लाडू, करंजी, बर्फी, पेढे यांचा आस्वाद घेणे ही परंपरा आहे. मात्र परंपरा आणि अतिरेक यामध्ये मोठा फरक आहे. सणांच्या काळात वाढणारी मिठाईची मागणी काही वेळा निकृष्ट दर्जाच्या कच्च्या मालाचा वापर करण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे अशा काळात स्वच्छता आणि अन्नसुरक्षा अधिक महत्त्वाची ठरते.

एफडीएच्या कारवाईने एक संदेश स्पष्ट दिला आहेअन्न विकणाऱ्या प्रत्येकाने नियम पाळलेच पाहिजेत. ग्राहकांनीही स्वस्त आणि आकर्षक दिसणाऱ्या पदार्थांच्या मोहात न पडता गुणवत्तेला प्राधान्य दिले पाहिजे.

### घरगुती आहाराचे महत्त्व

आपल्या पारंपरिक आहारात आरोग्याचे मोठे शास्त्र दडलेले आहे. भाकरी, भात, डाळ, भाज्या, ताक, फळे, कडधान्ये आणि घरगुती पदार्थ शरीराला आवश्यक पोषण देतात. घरच्या स्वच्छ वातावरणात तयार झालेले अन्न संसर्गाचा धोका कमी करते.

जुन्या पिढीचा साधा पण संतुलित आहार आजही आरोग्यदायी जीवनाचे उत्तम उदाहरण आहे. आधुनिक जीवनशैली स्वीकारताना या परंपरेतील चांगल्या गोष्टी टिकवून ठेवणे आवश्यक आहे.

ग्राहकांचीही जबाबदारी

आरोग्याची जबाबदारी केवळ प्रशासनाची नाही. ग्राहक म्हणून काही सवयी अंगीकारणे आवश्यक आहे.

स्वच्छता दिसत नसलेल्या ठिकाणी अन्न खरेदी टाळावे.

पॅकेजवरील उत्पादन तारीख आणि मुदत संपण्याची तारीख तपासावी.

अतिशय स्वस्त दरातील मिठाई किंवा दुग्धजन्य पदार्थांबाबत सावध राहावे.

संशयास्पद अन्नपदार्थ आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी.

जागरूक ग्राहक हेच सुरक्षित अन्नव्यवस्थेचे सर्वात मोठे बळ ठरू शकतात.

### आरोग्य हीच खरी संपत्ती

आज अनेकजण पैसा कमावण्यासाठी दिवस-रात्र मेहनत करतात; पण आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. नंतर त्याच पैशाचा मोठा भाग उपचारांवर खर्च करावा लागतो. चवीचा आनंद काही क्षणांचा असतो, पण चुकीच्या आहाराचे परिणाम अनेक वर्षे सोबत राहू शकतात.

म्हणूनच संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि स्वच्छ अन्न या चार गोष्टी जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनल्या पाहिजेत.

चव ही जीवनातील आनंदाचा भाग आहे; परंतु ती आरोग्याच्या किंमतीवर मिळता कामा नये. जिभेचे समाधान आणि शरीराचे संरक्षण यांचा समतोल राखणे हीच खरी शहाणपणाची गोष्ट आहे. सण असो किंवा दैनंदिन जीवन, स्वच्छ, पौष्टिक आणि सुरक्षित अन्नाची निवड ही केवळ वैयक्तिक सवय नाही, तर कुटुंब आणि समाजाच्या आरोग्याचीही हमी आहे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# १३ पैकी १२ मागण्या मान्य : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मराठा आंदोलकांनी केलेल्या १३ मागण्यांपैकी 'कायदेशीरदृष्ट्या वैध' असलेल्या १२ मागण्या सरकारने मान्य केल्या असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी नमूद केले. मराठा आंदोलकांनी केलेल्या १३ मागण्यांपैकी 'कायदेशीरदृष्ट्या वैध' असलेल्या १२ मागण्या सरकारने मान्य केल्या असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी नमूद केले. तसेच, उर्वरित मागणीबाबतच्या कायदेशीर अडचणींची आणि न्यायालयाच्या आदेशांविरुद्ध गेल्यास मराठा समाजाचे कसे नुकसान होऊ शकते, याची कल्पना सरकारने त्यांना दिली आहे. अशी टोकाची भूमिका घेण्याऐवजी, सणासुदीच्या दिवसांत नागरिकांना त्रास होणार नाही असा निर्णय आंदोलकांनी घ्यावा, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या सणांपैकी एक असलेल्या 'गणेशोत्सवा'दरम्यान नागरिकांना कोणतीही अडचण भासू नये, अशी सरकारची अपेक्षा असल्याचेही त्यांनी नमूद केले. फडणवीस म्हणाले की, कायदा व सुव्यवस्था राखणे ही पोलिसांची जबाबदारी आहे. मुंबईत आंदोलन करण्यासाठी जरांगे यांनी केलेला अर्ज पोलिसांनी फेटाळला होता. नवीन अर्जाबाबत पोलीस त्याच्या गुणवत्तेच्या आधारे निर्णय घेतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. गणेशोत्सवात आंदोलनामुळे कोणताही अडथळा येणार नाही अशी सरकारला आशा असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मुंबई आणि पुण्यात गणेशोत्सव अत्यंत थाटामाटात साजरा केला जातो.

सार्वजनिक स्तरावर साजरा होणारा हा एक अत्यंत महत्त्वाचा सण आहे, असे त्यांनी पत्रकारांना सांगितले.

# रस्त्याच्या मधोमध असलेला विद्युत खांब काढा

## एकलविहीर येथे सचिन ढोके व सहकाऱ्यांची मागणी

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – एकलविहीर ते करवार मार्गावरील जवळील रस्त्याच्या मधोमध असलेला विद्युत खांब तातडीने काढावा, अन्यथा होणाऱ्या नुकसानाला महावितरण जवाबदार राहील, असा ईशारा सचिन ढोके यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे.




महावितरणचे सहायक अभियंता यांना दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे की, एकलविहीर ते करवार मार्गावरील जवळील रस्त्याच्या मधोमध असलेला पोल काढण्यासाठी गेल्या अनेक दिवसापासून परिसरातील लोकांनी महावितरण विभागाला लेखी निवेदन दिले होते. जामठी, एकलविहिर, लिंगा, करवार येथील शेतकऱ्यांची शेती जास्तीत जास्त याच रस्त्यावर आहे तसेच तालुक्याच्या ठिकाणी जाण्याकरिता पण हाच मार्ग असल्याने नागरिक आणि शेतकऱ्यांना वाहतुक करण्याकरिता नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी विद्युत खांब अजिबात दिसत नसल्याने खांबाला मोटार सायकल, बैलगाडी, बसची टक्कर लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. भविष्यात कोणतेही जिवितहानी होऊ नये म्हणुन विद्युत खांब लवकरात लवकर काढावा अन्यथा होणाऱ्या नुकसानाला महावितरण जवाबदार राहील, असा ईशारा सचिन ढोके, अक्षय ढोके, राहुल कुर्डसिंगे, निकेश ढोके, शिवहरी हाडके, मनोज पंधरे व सहकाऱ्यांनी केली आहे.

# बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा बैलपोळा उत्साह व पारंपारिक पध्दतीने साजरा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)





**चांदस वाठोडा** – बळीराजाच्या जीवनात बैलांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. ऊन, वारा, पाऊस आणि थंडीची पर्वा न करता वर्षभर शेतकऱ्यांसोबत शेतात राबणाऱ्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साजरा केला जाणारा बैलपोळा सण चांदस-वाठोडा येथे मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला.

चांदस-वाठोडा येथील बेल नदीच्या तीरावर गेल्या अनेक वर्षांपासून बैलपोळ्याचा पारंपरिक सोहळा भरत आहे. यंदाच्या पोळा उत्सवात वाठोडा येथील सुमारे ३५ तर चांदस येथील २७ बैलजोड्यांनी सहभाग घेतला. यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

चांदस येथील शिवाजी देशमुख यांच्याकडून गुढी घेऊन येणारे किसना बारेदार, तसेच नितीन देशमुख यांच्याकडून गुढी घेऊन येणारे किशोर बारस्कर यांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. सर्व बैलांना घाट पाजल्यानंतर पारंपरिक पद्धतीने तोरण तोडण्याचा कार्यक्रम पार पडला.

वाठोडा येथील रामदास बोकडे व प्रशांत दळवेकर यांनी दरवर्षीप्रमाणे पारंपरिक वेशभूषा करून वाजत गाजत बैलांना घाट पाजत पोळ्याची परंपरा जोपासली. यावेळी लक्ष्मी देवस्थानच्या वतीने बैलमालकांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला तसेच शेतकऱ्यांच्या जीवनातील महत्त्वाचा सण असलेल्या बैल पोळ्यानिमित्त बळीराजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आमदार चंदु उर्फ उमेश यावलकर यांच्या वतीने सर्व बैलधारक शेतकरी बांधवांना भेट वस्तू देण्यात आल्या.

गुढी घेऊन येणारे मानकरी व बँड पथकांचाही शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान चांदस व वाठोडा येथील तरुणांनी खंड बोलून उपस्थितांचे मनोरंजन केले तसेच महादेवाच्या आरत्याही घेण्यात आल्या. पारंपरिक संस्कृती, श्रद्धा आणि शेतकरी जीवनाशी जोडलेला हा उत्सव पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. बैलपोळा उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी वाठोडा ग्रामपंचायत पदाधिकारी, पो-लीस पाटील व संबंधित अधिकारी यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी गावातील ज्येष्ठ मंडळी, शेतकरी, युवा वर्ग तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

शेतकरी आणि बैल यांच्यातील अतूट नाते, कृतज्ञता आणि ग्रामीण संस्कृतीची परंपरा जपत चांदस-वाठोडा येथे बैलपोळा उत्सव उत्साहात पार पडला.

## गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालयात आयोजन

# गणेशोत्सव व अभियंता दिनानिमित्य जनजागृती

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – गंगुबाई नामदेवराव शेरेकर विद्यालय तिवसाघाट येथे अभियंता दिनानिमित्त महाविद्यालयाची अभियंता रवींद्र खोडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी विद्युत सुरक्षा बचत व हरित ऊर्जा या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रम उत्साहात पार पडला.



यावेळी अभियंता रवींद्र खोडे यांनी आजच्या आधुनिक युगात अन्न वस्त्र निवारा इतकीच विज मानवी जीवनाची एक अनिवार्य गरज बनली आहे. यासोबतच विजेची निर्मिती कशी होते? ऊर्जा बचत का करावी आणि विजेचा अपव्यय कसा टाळावा? याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनातून प्रबोधन केले आणि विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली.

याप्रसंगी मुख्याध्यापक सुधीर श्रीराव, शिक्षक ममता खासबागे, सतीश नेरकर, कुमुद भोरकर, शिक्षकेत्तर कर्मचारी हेमंत चौकडे, हिरेन्द्र देसली, लक्ष्मीकांत बेलथरीया आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यालयातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# समान नागरी कायद्याला जेडीयूची सशर्त तयारी

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पाटणा** – 'समान नागरिक संहिता' विधेयकातील तरतुदी जर आक्षेपार्ह नसतील, तर त्यांची आपला पक्ष या विधेयकाला विनाकारण विरोध करणार नाही, असे बिहारचे उपमुख्यमंत्री आणि जदयूचे नेते विजयकुमार चौधरी यांनी मंगळवारी स्पष्ट केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी '२०२९ पर्यंत सर्व एनडीएशासित २२ राज्यांमध्ये यूसीसी लागू केला जाईल' असे विधान केल्यापासून राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर जद(यु) पक्षाच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत माजी विधानसभा अध्यक्ष विजय चौधरी यांनी पक्षाची भूमिका मांडली. मुख्य विरोधी पक्ष असलेल्या राष्ट्रीय जनता दलाने (आरजेडी) 'हा कायदा मुस्लिमांच्या हिताच्या विरोधात आहे' असा आरोप करत बिहारमध्ये यूसीसी लागू होऊ न देण्याचा इशारा दिला आहे.

## जिल्हा न्यायालय-१ येथे

# राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये शेकडो प्रकरणे निकाली

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई याचे निर्देशानुसार तालुका विधी सेवा समिती वरुड अंतर्गत जिल्हा न्यायालय वरुड येथे 'राष्ट्रीय लोक अदालत' चे आयोजन करण्यात आले होते.



त्यामध्ये जिल्हा न्यायाधीश अ.अ.पंचभाई, दिवाणी न्यायाधीश व्ही.व्ही.राजुरकर अशी दोन पॅनलची व्यवस्था करण्यात आली होती. या लोकअदालतीमध्ये २ हजार ३७३ दाखलपुर्व प्रकरणे तसेच न्यायालयात प्रलंबित असलेली एकूण ६७६ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी २२ दाखलपुर्व प्रकरणे आणि ८५ न्यायालयात प्रलंबित प्रकरणे नागरिकांनी आपसी तडजोडीने निकाली काढण्यात आली आहेत.

सदर लोकअदालत जिल्हा न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष अ.अ.पंचभाई यांचे प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली तसेच या लोअदालतीमध्ये पॅनल न्यायाधिश म्हणुन अ.अ.पंचभाई व व्ही.व्ही.राजुरकर यांची उपस्थिती होती. पॅनल वकील सदस्य ॲड.पी.बी.कोल्हारे व ॲड.ज्ञानदीप पाटणकर, आणि कर्तव्यावर नेमलेल्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. या लोकअदालतीमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकांनी सहभाग घेवुन आपली प्रकरणे आपसी तडजोडीने मिटवुन लोकअदालतीचा लाभ घेतला.

## ऑरेंजसिटी थॅलेसेमिया निर्मुलन समिती सचिव

# अक्षय वैद्य राष्ट्रीय सेवा रत्न पुरस्काराने सन्मानित

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील ऑरेंजसिटी थॅलेसेमिया निर्मुलन समिती सचिव अक्षय रत्नाकर वैद्य यांना रामकृष्ण सेवा फाऊंडेशन अयोध्या द्वारा उत्तर प्रदेशातील अयोध्याधाम येथे राष्ट्रीय रक्तदान महोत्सव राष्ट्रीय सेवा रत्न सन्मान २०२६ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



या प्रसंगी अक्षय वैद्य यांनी आपल्या जीवनातील ३९ वे रक्तदान करून गरजु रुग्णांचे प्राण वाचविण्याकरीता सहकार्य केले आहे. अक्षय वैद्य हे रक्तदानाच्या क्षेत्रात अग्रेसर असून जिल्ह्यातील थॅलेसेमियाग्रस्त व्यक्तींना वेळेवर रक्त मिळावे, याकरीता अमरावती थॅलेसेमिया निर्मुलन व रक्तदान समिती यांच्या तर्फे सदैव तत्पर राहून कार्य करीत असतात. अक्षय वैद्य यांना हा पुरस्कार रामकृष्ण सेवा फाऊंडेशनचे संस्थापक राजेश चौबे व अध्यक्ष आकाश गुप्ता यांचे हस्ते विविध राज्यातील रक्तवीर व समाजसेवक यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आला. अक्षय वैद्य यांना यापुर्वी सुद्धा वीर बिरसामुंडा आंतरराष्ट्रीय रक्तदाता सन्मान प्राप्त झालेला आहे.

अक्षय वैद्य यांना पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल राजकुमार राठोड, जयेश नाईक, पंकज गावंडे, ऑरेंजसिटी थॅलेसेमिया निर्मुलन समिती अध्यक्ष डॉ.प्रवीण ठाकरे, उपाध्यक्ष पंकज लेकुरवाळे, लोकेश अग्रवाल, प्रा.किशोर तडस, ॲड.आशिष वानखडे, संदेश कावरे, प्रज्वल बोंडे, अतुल काळे, बंटी काझी, रक्तवीर सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र शेटीये, उपाध्यक्ष नितीन गर्जर, सचिव कैलाश उपाध्याय, महेश बिलगये, डॉ.अरविंद बडघरे, लंकेश्वर उमक, सिक्की राजपूत, कपिंद्र शेटीये, शैलेश घोटे, तुषार घोटे, अजय राठोड, उन्नती राठोड, पूनम शेटीये व अमरावती थॅलेसेमिया रुग्णसेवा समितीचे अध्यक्ष दलवीर व्यास, गजानन आंडे, संजय हडाळे, एल.के.व्ही पवार यांनी अभिनंदन केले आहे.

**वरुड :** कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक तथा जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे संचालक, प्रसिध्द उद्योजक राजेश गांधी यांचा वाढदिवस शहरात मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. अनेकांनी त्यांच्या कार्यालय व निवासस्थानी जावुन पुष्पगुच्छ देवुन त्यांना शुभेच्छा दिल्या.












# ‘मनोज जरांगे, गेल्यावेळेस आलात, धिंगाणा केला , मुंबईत घाण केली, यावेळीही...’

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मराठा आरक्षणासाठी मराठा नेते मनोज जरांगे पाटील गेल्या १९ दिवसांपासून उपोषण करत आहेत.

सरकार आणि मनोज जरांगे यांच्या चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या, पण अजूनही मराठ्यांच्या आरक्षणावर तोडगा निघू शकलेला नाही. १२ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत मुंबईत आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा निर्णय झाला. त्याप्रमाणे काल (मंगळवारी, १५ सप्टेंबर) मनोज जरांगे यांनी सकाळी ११ वाजता आंतरवालीतून मुंबईकडे प्रस्थान केलंय. एकीकडे मनोज जरांगे मुंबईकडे मराठ्यांसह कूच करत आहे. अशातच सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर विकास पाठक उर्फ ’हिंदुस्तानी भाऊ’ यानं मनोज जरांगेंवर निशाणा साधला आहे. तसेच, ’हिंदुस्तानी भाऊ’ यानं मनोज जरांगे, त्यांचं उपोषण आणि मराठा आंदोलनावर बोलताना वादग्रस्त वक्तव्य केलंय.

## सीईटी परीक्षेचीही सीट चौकशी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – अभियांत्रिकीसह व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या राज्याच्या ‘एमएच-सीईटी’ परीक्षेबाबतच्या सर्व तक्रारींची सर्वंकष चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली. ‘जर यात कोणतीही अनियमितता आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल,’ असे मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी स्पष्ट केले. राज्यभरातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या एका शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन सामायिक प्रवेश परीक्षेशी (सीईटी) संबंधित विविध समस्या मांडल्या होत्या.


### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ), ( कनिष्ठ स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७१८/२०२६ ने.ता.२७/११/२०२६**

**अर्जदार :-**

१)श्रीमती सुलभा सोपान बोपची, वय अं.५६ वर्ष, धंदा-गृहीणी

२) अंकुश सोपान बोपची, वय अं.३० वर्ष, धंदा-शेती

३) हर्षल सोपान बोपची, वय अं.२९ वर्ष, धंदा- शेती

सर्व रा.वार्ड क्र.३, रा.राजुरा बाजार, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सोपान महादेवराव बोपची, रा.राजुरा बाजार, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०९/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ), ( कनिष्ठ स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७०६/२०२६ ने.ता.२७/११/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती व्दारका अरुणराव डहाके, वय अं.७१ वर्ष, धंदा-आराम, २) हेमंत अरुणराव डहाके, वय अं.५१ वर्ष, धंदा-शेती, ३) नितीन अरुणराव डहाके, वय अं.४९ वर्ष, धंदा-शेती, ४) जितेंद्र अरुणराव डहाके, वय अं.४३ वर्ष, धंदा- शेती, क्र.१ ते ४ रा.वार्ड क्र.२, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, ५) प्रज्ञा खुशाल अकर्ते, वय अं.४५ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.सावता चौक, शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत अरुण मारोतराव डहाके, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०९/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**


# शिवसेना फूटप्रकरणी घटनेचे उल्लंघन नाही : एकनाथ शिंदेंच्या वकिलांचा दावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**नवी दिल्ली** – पक्ष आणि चिन्ह कोणाचे हे आमदार आणि खासदारांच्या संख्येवर ठरवण्यात आले आणि निवडणूक आयोगाला तसा निर्णय घेण्याचा अधिकार आहे, शिवसेनेच्या बाबतीत विधानसभा अध्यक्ष आणि निवडणूक आयोगाने जो निकाल दिला तो योग्यच असून राज्य घटनेचे कोणतेही उल्लंघन झाले नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाने शिवसेना ही एकनाथ शिंदे यांच्याकडेच ठेवण्याचा निर्णय घेतला, असा दावा ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात केला. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरण आणि पक्ष व ’धनुष्यबाण’ चिन्हाच्या मालकीबाबत सुरू असलेली अंतिम सुनावणी मंगळवारीही सुरू राहिली. यावेळी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाने केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे समर्थन करत, ’उद्धव ठाकरे गटापेक्षा आमचाच पक्ष कसा खरा शिवसेना आहे’ यावर जोरदार युक्तिवाद केला. पुढील सुनावणी बुधवारी होणार आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जोयमाल्या बागची आणि न्या.व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडत आहे. निवडणूक आयोगाने १७ फेब्रुवारी २०२३ रोजी शिंदे गटाला खरी शिवसेना म्हणून मान्यता देऊन ’धनुष्यबाण’ चिन्ह बहाल केले होते.


### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ), ( कनिष्ठ स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६७९/२०२६ ने.ता.२७/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) सौ.माला अरुण धोटे, वय अं.५५ वर्ष, धंदा-शेती

२) अरुण वसंतराव धोटे, वय अं.५९ वर्ष, धंदा- शेती

दोन्ही रा.वार्ड क्र.२, वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत महेश अरुणराव धोटे, रा.वाठोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिधीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०९/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, प्रभारी दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८०५/२०२६ ने.ता.२२/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) दिपेश साहेबराव मांडे, वय अं.३६ वर्ष, धंदा-नोकरी

२) प्रतिक साहेबराव मांडे, वय अं.३४ वर्ष, धंदा- शेती

अर्जदार क्र.१ व २ रा.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे साहेबराव शांतिकराम मांडे व शिलाबाई साहेबराव मांडे, रा.एकदरा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०९/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, प्रभारी दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८०७/२०२६ ने.ता.२६/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) रविंद्र ऊध्दवराव कुबडे, वय अं.४३ वर्ष, धंदा-मजुरी, २) विनोद ऊध्दवराव कुबडे, वय अं.४१ वर्ष, धंदा- मजुरी, ३) सौ.मयुरी ललीता हांडे, वय अं.३७ वर्ष, धंदा- घरकाम, अर्जदार क्र.१ व २ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती, क्र.३ रा.तळेगाव ठाकुर, ता.तिवसा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे ऊध्दव शामराव कुबडे व दुर्गाताई उध्दवराव कुबडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२६/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०९/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७९६/२०२६ ने.ता.२२/१०/२०२६**

**अर्जदार :-**

अशोक महादेवराव गाडगे

वय अं.६९ वर्ष, धंदा-मजुरी

अर्जदार क्र.१ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- कोणी नाही**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मय्यत नामे मुक्ताबाई महादेवराव गाडगे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२२/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०९/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# १६० कोटींच्या घोटाळ्यात उपासनीला तिसऱ्यांदा धक्का, जामीन अर्ज फेटाळला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नाशिक** – नाशिक मधील तब्बल १६० कोटी रुपयांच्या शालार्थ घोटाळ्याप्रकरणी राज्य शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष आणि मुख्य संशयित नितीन मुरलीधर उपासनी यांच्या अडचणी कायम आहेत.

नाशिकरोड सत्र न्यायालयाने उपासनी यांचा जामीन अर्ज तिसऱ्यांदा फेटाळून लावला आहे. त्यामुळे त्यांचा नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहातील मुक्काम कायम राहणार




आहे. दरम्यान, या प्रकरणातील दुसरे संशयित आणि माजी शिक्षणाधिकारी शशिकांत हिंगोणेकर यांच्या जामीन अर्जावर २८ सप्टेंबर रोजी सुनावणी होणार आहे. बनावट नियुक्ती आदेशांचा आरोप तपासात या घोटाळ्यात शिक्षण विभागातील एकाच जावक (आऊटवर्ड) क्रमांकाचा गैरवापर करून वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावाने बनावट नियुक्ती आदेश जारी केल्याचे समोर आले आहे. तपासादरम्यान तब्बल १२४ प्रकरणांमध्ये अधिकृत प्रशासकीय नोंदी आणि प्रत्यक्ष सिस्टीममधील डेटामध्ये मोठी तफावत आढळून आली.

शासकीय कागदपत्रांमध्ये नियोजनबद्ध पद्धतीने फेरफार करून सरकारची सुमारे १६० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप या प्रकरणात आहे. उपासनी यांचा जामीन अर्ज फेटाळताना न्यायालयाने या प्रकरणाच्या स्वरूपाबाबत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. न्यायालयाच्या निरीक्षणानुसार, हा प्रकार संघटित स्वरूपाचा आणि सरकारी निधीशी संबंधित पांढरपेशा गुन्हा असल्याचे दिसून येते. अशा प्रकारच्या गुन्ह्यांमुळे सार्वजनिक प्रशासनाच्या अखंडतेवर आणि विश्वासार्हतेवर परिणाम होऊ शकतो, असे नमूद करत न्यायालयाने उपासनी यांना जामीन देण्यास नकार दिला.

## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने –१५३४४० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने –१४०६५० रु.(१०ग्रॅम)

चांदी – २,४५,००० रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी | १६५० | २००० |
| गहू | २५०० | ३००० |
| तूर | ६१०० | ६३९० |
| मूग | ६५०० | ७००० |
| उडीद | ६००० | ७००० |
| हरभरा | ५६०० | ५९०० |
| सोयाबिन | ४१०० | ४३५० |
| बाजरा | २००० | २३०० |
| तिळ | ८२०० | ९३०० |
| भुईमूग | ५१५० | ५३५० |
| मका | २२०० | २३०० |

# मनोज जरांगेच्या भाषेबद्दल मंत्रिमंडळ बैठकीत नाराजी

## महायुतीच्या नेत्यांना लक्ष्य करत असल्याचा आरोप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे-पाटील यांच्याकडून घेतली जाणारी राजकीय भूमिका तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री आणि इतर राजकीय नेत्यांबाबत वापरल्या जाणाऱ्या आक्षेपार्ह भाषेचे तीव्र पडसाद मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत उमटले. मराठा समाजासाठी आजवर कोणत्याही सरकारने घेतले नाहीत एवढे निर्णय महायुती सरकारने घेऊनही जरांगे-पाटील महायुतीच्या नेत्यांना जाणीवपूर्वक लक्ष्य करत आहेत. तसेच त्यांच्याकडून वापरली जाणारी भाषा अतिशय खालच्या पातळीवरील आहे, अशी शब्दात अनेक मंत्र्यांनी जरांगे यांच्याविरोधात मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली. जरांगे यांना मुंबईत येऊ न देता मुंबईच्या वेशीवर गाठून त्यांची परत पाठवणी करण्याबाबत बैठकीत चर्चा झाल्याचे समजते. मनोज जरांगे यांनी येत्या १९ सप्टेंबरपासून मुंबईतील आझाद मैदानात आंदोलनाला बसण्याचा निर्धार केला आहे. त्यासाठी ते आज आपल्या समर्थकांसह आंतरवली सराटी येथून मुंबईच्या दिशेने निघाले आहे. आंदोलनाच्या दरम्यान सरकारच्या शिष्टमंडळाने जरांगेशी अनेकदा चर्चा झाली. तरीही ते सरकारला आव्हान देत आहेत. त्यामुळे जरांगेंना आवर घालण्याची मागणी ज्येष्ठ मंत्र्यांनी केल्याचे समजते.

आंदोलनाच्या आडून राजकीय पोळी भाजू नका – शिंदे मराठा समाजाच्या न्याय्य मागण्यांबाबत सरकार सुरुवातीपासूनच सकारात्मक असून, समाजाला न्याय देताना ओबीसी किंवा अन्य कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही, ही सरकारची स्पष्ट भूमिका आहे.

# साखर कारखान्यांना ७३८ कोटींचे व्याज अनुदान

## सहकारी साखर कारखान्यांसाठी सुलभ कर्ज योजना, राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** - आगामी गाळप हंगामाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सहकारी साखर कारखान्यांसाठीच्या सुलभ कर्ज योजनेला मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. साखर कारखान्यांना थकीत एफआरपीची रक्कम देण्यासाठी तसेच आगामी गाळप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी निधी उपलब्ध व्हावा, यासाठी ही योजना राबवण्यात येणार आहे. त्यासाठी ७३८ कोटी ५१ लाख रुपयांच्या व्याज अनुदानासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या निर्णयाचा लाभ राज्यातील १०२ सहकारी साखर कारखान्यांना होईल. राज्यात २०२५-२६ मधील गाळप हंगामात १०२ सहकारी साखर कारखान्यांनी ५२७.५१ लाख मे.टन ऊस गाळप केले. मात्र साखर कारखान्यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेता शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम देण्यासाठी आणि पुढील हंगामाच्या पूर्वतयारीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता होती. त्यानुसार या योजनेस मान्यता देण्यात आली.







